माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ४०९ / २०२५ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
करण अभिनय बोधे	सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, हवेली क्र. २, पुणे	सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी , पुणे शहर, पुणे

(सुनावणी दिनांक - १७ / ०३ / २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २७.०१.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान यांचे प्रतिनिधी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या लेखी निवेदनात नमुद केले आहे की, "जन माहिती अधिकारी यांच्याकडे दस्तऐवज कागदपत्रे मागणी केले होते, व कार्यालयाकडून आवश्यक कागदपत्रे देण्यात आले, त्याबाबत काही हरकत नाही. तरी त्या अनुषंगाने अपील अर्ज मागे घेत आहे. सदर अपिल निकाली काढण्यास विनंती केली आहे.

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थी यांना माहितीचे प्रदान झाले आहे. त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुत द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ४०९ / २०२५ / पुणे 2630 | 2026 दिनांक - 5/6/2026.

रामाआ-पुणे/२०२६ /AMC